महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १०५ वे | दिनांक : १०/०४/२०२६ | वार : शुक्रवार

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुन्हा दरे गावाच्या दौऱ्यावर



**सातारा :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा तीन दिवसांचा सातारा दौरा सुरु झाला असून त्यांच्या दरेगाव भेटीला राजकीय वर्तुळात विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. हा दौरा अधिकृतपेक्षा खाजगी असल्याचे सांगितले जात असले तरी, अलीकडील घडामोडींच्या पार्श्वभूमीवर या भेटीकडे राजकीय नजरेने पाहिले जात आहे.

सातारा जिल्हा परिषदेच्या नुकत्याच झालेल्या अध्यक्ष आणि उपाध्यक्ष निवडीत मोठे राजकीय नाट्य रंगले होते. या निवडीदरम्यान शिवसेना आणि भाजपमधील अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले होते. त्यातच नवनिर्वाचित अध्यक्षांच्या जात प्रमाणपत्रावरून सुरू झालेला कायदेशीर वाद आणि तक्रारदारांनी घेतलेला आक्षेप यामुळे जिल्ह्यातील सत्तासमीकरणे अस्थिर झाली आहेत. या सर्व घडामोडींच्या केंद्रस्थानी सातारा जिल्हा असल्याने मुख्यमंत्र्यांच्या या दौऱ्यात 'डॅमेज कंट्रोल' संदर्भात काही ठोस निर्णय घेतले जाण्याची दाट शक्यता आहे.

गुरुवारी दुपारी हेलिकॉप्टरने शिंदे यांचे दरेगावात आगमन झाले. ते येथे मुक्काम करणार असून स्थानिक पातळीवरील काही भेटीगाठी आणि चर्चा होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. जिल्हा परिषद निवड प्रक्रियेतील घडामोडी, त्यानंतर निर्माण झालेला वाद, तसेच सत्तासमीकरणातील बदल यामुळे या दौऱ्याला राजकीय रंग चढला आहे.

दरम्यान, पालकमंत्री शंभूराज देसाई आणि इतर स्थानिक नेत्यांच्या हालचालींच्या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांच्या या भेटीकडे लक्ष लागले आहे. विशेषतः जिल्हा परिषद निवडीनंतर शिवसेना आणि भाजपमधील निर्माण झालेल्या तणावाच्या संदर्भात या दौऱ्यात काही राजकीय संदेश दिला जाऊ शकतो, अशी चर्चा सुरू आहे. एकनाथ शिंदेंच्या दरे गावी मुक्कामादरम्यान महत्त्वाच्या बैठका किंवा अंतर्गत चर्चा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे हा दौरा केवळ वैयक्तिक की राजकीय रणनीतीचा भाग, याबाबत पुढील दोन-तीन दिवसांत अधिक स्पष्टता येण्याची शक्यता आहे.

एकूणच, मुख्यमंत्र्यांचा हा 'गाव दौरा' केवळ विश्रांतीपुरता मर्यादित नसून, सातारा जिल्ह्यातील बिघडलेले राजकीय समीकरण दुरुस्त करण्यासाठीची ही एक महत्त्वाची 'फिल्डिंग' असल्याचे बोलले जात आहे.

# घटस्फोटास नकार दिल्याने पतीने गळा चिरून संपवले



**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील करमाड परिसरात माणुसकीला काळिमा फासणारी एक अत्यंत भीषण घटना घडली आहे. करमाड परिसरातील एका पेट्रोल पंपावर कामावर असलेल्या पत्नीची पतीनेच निर्घृण हत्या केली. दुसरे लग्न करण्यासाठी घटस्फोट देण्यास नकार दिल्याच्या रागातून पतीने हे टोकाचे पाऊल उचलले असून, भरवस्तीत घडलेल्या या घटनेमुळे कायदा-सुव्यवस्थेच्या चिंधड्या उडाल्याचे विदारक चित्र पाहायला मिळाले. पोलिसांनी अवघ्या एका तासाच्या आत आरोपी पतीला बेड्या ठोकल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, पूजा गावंडे करमाड येथील गणपती मंदिराजवळ असलेल्या इंडियन ऑईल पेट्रोल पंपावर कर्मचारी म्हणून कार्यरत होती. आज दुपारी 12:30 च्या सुमारास ती आपल्या कामात व्यस्त असताना, तिचा पती सत्यम रावसाहेब गावंडे हा दुचाकीवरून तिथे पोहोचला. दोघांमध्ये घटस्फोटावरून काही वेळ शाब्दिक बाचाबाची झाली. मात्र, रागाच्या भरात असलेल्या सत्यमने अचानक खिशातील धारदार चाकू काढला आणि काही समजण्याच्या आत पूजाच्या पाठीत बुक्का मारून तिला जमिनीवर पाडले आणि तिच्या गळ्यावर सपासप वार केले. या हल्ल्यात पूजा यांचा जागीच मृत्यू झाला.

सत्यम हा पूजावर चाकुने वार करत असताना, पेट्रोल पंपावर उपस्थित एक व्यक्ती तिला वाचवण्यासाठी पुढे आला, मात्र नराधम सत्यमने त्यालाही चाकूचा धाक दाखवून जीवे मारण्याची धमकी देत मागे हटवले. यानंतर सत्यम दुचाकीवर बसून घटनास्थळावरून फरार झाला. या घटनेचा अंगावर काटा आणणारा व्हिडिओही समोर आला असून, आरोपीच्या डोळ्यात माणुसकीचा लवलेशही उरला नसल्याचे त्यात दिसत आहे. घटनेची माहिती मिळताच करमाड पोलिस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवली आणि अवघ्या एक तासाच्या आत आरोपी सत्यम गावंडे याला ताब्यात घेतले. सध्या त्याची सखोल चौकशी सुरू आहे.

पोलिस चौकशीत समोर आलेल्या माहितीनुसार, मृत पूजा गावंडे यांचा जीवनप्रवास अत्यंत संघर्षाचा होता. पहिल्या पतीच्या निधनानंतर दोन लहान मुलांच्या संगोपनाची जबाबदारी त्यांच्यावर होती. सहा महिन्यांपूर्वीच त्यांचे लग्न चुलत दीर असलेल्या सत्यम गावंडे याच्याशी आळंदी येथे लावून देण्यात आले होते. मात्र दोघांचे सूत जुळलेच नाही. लग्नाच्या काही दिवसांतच दोघांमध्ये खटके उडू लागले आणि ते वेगळे राहू लागले. आरोपी सत्यमला दुसरे लग्न करायचे होते, त्यासाठी तो पूजाकडे वारंवार कायदेशीर घटस्फोटासाठी दबाव टाकत होता. मात्र, आपल्या मुलांच्या भविष्याचा विचार करून पूजाने घटस्फोट देण्यास स्पष्ट नकार दिला होता. हाच राग मनात धरून सत्यमने अखेर पुजाला संपवले.

# धनंजय मुंडेंनी माझा अर्ज बाद करण्यासाठी मुंबईहून वकील पाठवला





**पुणे :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत आता राजकीय ठिणगी पडली आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी करुणा मुंडे यांनी आपला अर्ज कायम ठेवत निवडणूक लढवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केलेत. बारामती पोटनिवडणुकीत माझा अर्ज बाद करण्यासाठी धनंजय मुंडेंनी मुंबईहून वकील पाठवला होता, असे त्या म्हणाल्यात. करुणा मुंडेंच्या या आरोपामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

बारामती पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर उमेदवारांनी माघार घेतली. काँग्रेसचे उमेदवार आकाश मोरे यांनीही आपला अर्ज मागे घेतल्याने राजकीय समीकरणांमध्ये बदल झाला आहे. एकूण ५३ उमेदवारांपैकी तब्बल ३० उमेदवारांनी माघार घेतली असून आता २३ उमेदवार रिंगणात उरले आहेत. बिग बॉस फेम अभिजीत बिचुकले आणि करुणा मुंडे-शर्मा यांचे अर्ज कायम आहेत.

करुणा मुंडे यांनी आज माध्यमांशी बोलताना धनंजय मुंडे यांच्यावर थेट निशाणा साधला. "धनंजय मुंडे यांनी माझा उमेदवारी अर्ज बाद करण्यासाठी मुंबईहून एक नामवंत वकील पाठवला होता. माझ्या प्रतिज्ञापत्रात त्यांची मालमत्ता का दाखवली नाही, असा आक्षेप त्या वकिलाने घेतला. एकीकडे मुंडे म्हणतात की मी त्यांची पत्नी नाही, तर दुसरीकडे वकिलामार्फत माझ्या अर्जावर मालमत्तेवरून आक्षेप घेतात," असा दावा करुणा शर्मा यांनी केला. तसेच, अर्ज मागे घेण्यासाठी राष्ट्रवादीच्या तीन मोठ्या नेत्यांचे फोन आल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

करुणा शर्मा यांनी यावेळी बारामतीची पोटनिवडणूक लढवण्यामागचे कारण देखील सांगितले. जर अजितदादांच्या अपघाताचा एफआयआर (FIR) दाखल झाला असता, तर मी उमेदवारी मागे घेतली असती, असे त्यांनी म्हटले. इतक्या मोठ्या व्यक्तीच्या अपघाताची तक्रार जर घेतली जात नसेल, तर उद्या माझ्यासोबत काही विपरीत घडले तर कुणाला सांगायचे? म्हणूनच मी ही निवडणूक लढवत असल्याचे करुणा मुंडे यांनी स्पष्ट केले.

करुणा मुंडे यांनी पुढे स्पष्ट केले की, निवडणुकीतून उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी राष्ट्रवादीच्या मोठ्या तीन लोकांचे फोन आले होते. मात्र मी ही निवडणूक लढवणार असून, घरोघरी जाऊन प्रचार करणार आहे. तसेच पदयात्रा देखील करणार आहे. करुणा मुंडेंच्या या आक्रमक भूमिकेमुळे बारामतीतील निवडणूक अधिक चुरशीची होण्याची चिन्हे आहेत.

बारामती आणि राहुरी पोटनिवडणुकीचा अधिकृत कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून ३० मार्च २०२६ रोजी अधिसूचना प्रसिद्ध झाली. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ६ एप्रिल होती, तर ७ एप्रिल रोजी छाननी पार पडली. आज ९ एप्रिल ही अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत होती. आता २३ एप्रिल रोजी मतदान होणार असून ४ मे रोजी मतमोजणी केली जाईल. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ६ मे २०२६ पर्यंत पूर्ण केली जाणार आहे.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड., एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १० एप्रिल २०२६


## जनगणना २०२७ अंतर्गत बीड येथे फिल्ड ट्रेनरच्या तीन दिवसीय प्रशिक्षणास प्रारंभ



**बीड (भगवंत पाळवदे) :** भारताची जनगणना २०२७ अंतर्गत गृह सूचीकरण व गृहनिर्माण जनगणनांना या महत्त्वपूर्ण टप्याच्या पूर्वतयारीसाठी बीड जिल्ह्यात फिल्ड ट्रेनर्सच्या तीन दिवशी प्रशिक्षणास प्रारंभ झाला आहे. जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथील जिल्हा नियोजन सभागृहात आयोजित या प्रशिक्षणात जिल्ह्यातील एकूण ९० फील्ड ट्रेनर सहभागी झाले आहेत. हे प्रशिक्षण दोन टप्प्यात बॅचेस मध्ये आयोजित करण्यात आले असून बॅच क्रमांक एक व दोन साठी दि. ६ एप्रिल ते ८ एप्रिल २०२६ आणि ब्याच क्रमांक ३ साठी दिनांक ९ एप्रिल ते अकरा एप्रिल २०२६ असा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. प्रशिक्षण दररोज सकाळी १०:३० वाजता सुरू होत असून यामध्ये तांत्रिक कौशल्य कार्यपद्धती तसेच प्रत्यक्ष क्षेत्रीय कामकाजाबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात येत आहे. या प्रशिक्षण सत्राचे उद्घाटन जिल्हा जनगणना अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना ते म्हणाले की जनगणना ही केवळ आकडेवारी नसून देशाच्या पुढील दहा वर्षांच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे त्यामुळे ही प्रक्रिया वेळेत अचूक व पारदर्शकपणे पूर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच घर यादी तयार करताना जिल्ह्यातील प्रत्येक घर व प्रत्येक कुटुंबाची अचूक नोंद होईल यासाठी प्रगनक व प्रर्यवेक्षकांनी विशेष दक्षता घ्यावी. अशा सूचना फील्ड ट्रेनर्स यांना केल्या. नागरिकांशी सकारात्मक संवाद साधून त्यांचा जनगणनेत सक्रिय सहभाग वाढविण्याचे त्यांनी आवाहन केले. या प्रशिक्षणासाठी मास्टर ट्रेनर म्हणून शैलेश खडसे मुख्याधिकारी नगरपरिषद बीड, अनुज गोठी Dpa-Gr-b मुंबई, श्रीकांत बनकर Dpa-Gr-b मुंबई तसेच कैलास बळवंत गटविकास अधिकारी पंचायत समिती अंबाजोगाई यांनी सहभाग नोंदविला मास्टर ट्रेनर्सना प्रत्येक्ष क्षेत्रीय कामकाजा दरम्यांना उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणी व त्यावरील उपाय योजनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासन शैलेश सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

## जिंतूर येथे भीमजयंती निमित्ताने अविनाश भारती यांच्या किर्तनाचा कार्यक्रम



**जिंतूर (बी.डी. रामपूरकर) :** विश्वभुषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंती निमित्ताने आज दि(१०) रोजी सायंकाळी ६ वाजता जिंतूर शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर येथे महाराष्ट्रातील ख्यातनाम परिवर्तनवादी किर्तनकार किर्तन केसरी अविनाश महाराज भारती यांच्या किर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला जिंतूर शहर आणि तालुक्यातील प्रशासनातील अधिकारी तसेच सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्ष रमेश दरगड कार्यक्रमाचे उद्घाटक बाळासाहेब भांबळे स्वागताध्यक्ष इस्माईल पहेलवान डॉ देवराव कन्हाळे उपस्थित राहणार असून याप्रसंगी परभणी जिल्हा परिषदेच्या नवनिर्वाचित अध्यक्षा लताताई वाकळे यांचा समाज बांधवांच्या वतीने नागरी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाला उपस्थीत राहण्याचे आवाहन आयोजन समितीचे अध्यक्ष दिलीप माघाडे, निमंत्रक रत्नदीप शेजावळे भगीरथ मिरासे सतीशभैय्या वाकळे सुखदेव वाहूळे खुशाल घनसावध प्रवीण वाकळे भास्कर सुरवसे शंकर वाघ बाळासाहेब घुगे यांनी केले आहे.

## गहिनीनाथ गडाच्या विकासासाठी कटिबद्ध - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**बीड (भगवंत पाळवदे)** म्हसोबावाडी (ता. आष्टी, जि. बीड) येथे पार पडलेल्या श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाच्या 94 व्या नारळी सप्ताहाच्या समारोप प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत भावनिक शब्दांत आपली भूमिका मांडली, "मी येथे मुख्यमंत्री म्हणून नाही, तर गहिनीनाथ महाराजांचा अनुयायी म्हणून नतमस्तक होण्यासाठी आलो आहे. गडाच्या विकासासाठी रस्ता असो वा अन्य कोणताही प्रश्न, तो सोडविण्यास मी कटिबद्ध आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.संत वामनभाऊ महाराज यांनी सुरू केलेल्या या पवित्र परंपरेचा समारोप गुरुवारी (दि. 9) काल्याच्या कीर्तनाने झाला. यावेळी गहिनीनाथ गडाचे विठ्ठल महाराज, राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, आमदार सुरेश धस, आमदार धनंजय मुंडे, माजी आमदार भीमराव धोंडे, माजी आमदार साहेबराव दरेकर, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, बाळासाहेब आजबे, प्रताप ढाकणे, सरपंच शिवा शेकडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, "संत वामनभाऊ यांनी केलेले कार्य अविस्मरणीय आहे. नाथ संप्रदायात गहिनीनाथांचे महात्म्य मोठे असून, या गडावर प्रत्येक काम अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडते, हे मी प्रत्यक्ष अनुभवले आहे." विशेष म्हणजे, या नारळी सप्ताहाचे नियोजन 2039 पर्यंत निश्चित झाले आहेत यातच या भक्तीकार्याचे यश दिसते .समाजाला एकत्र आणण्याचे हे काम अतिशय मोलाचे आहे असे मुख्यमंत्री म्हणाले पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी, "गहिनीनाथ गडाचा नारळी सप्ताह कायमस्वरूपी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या यजमानपदाखाली व्हावा व त्यांनी गड दत्तक घ्यावा," अशी मागणी केली. तसेच स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या कार्याच्या आठवणींना उजाळा देत, त्यांच्या विचारांवर आपण काम करत असल्याचे त्यांनी सांगितले.आमदार धनंजय मुंडे म्हणाले की, "संत वामनभाऊ यांनी सुरू केलेला हा सप्ताह आज महंत विठ्ठल महाराज यांच्या जन्मगावी होत आहे, हा योगायोग विशेष आहे. गेल्या 25 वर्षांपासून मला येथे पूजनाचा मान मिळत आहे."दरम्यान, आमदार सुरेश धस यांनी नगर-बीड महामार्गाच्या कामासाठी भरीव निधी देण्याची मागणी करत, या रस्त्यावर होणाऱ्या अपघातांकडे मुख्यमंत्री यांनी विशेष लक्ष द्यावे, असे आवाहन केले.या नारळी सप्ताहाच्या निमित्ताने भाविकांची मोठी गर्दी झाली होती.

## जळालेल्या इसमाचा उपचारा दरम्यान मृत्यु

**दौलताबाद :** माळीवाडा आण्णा भाऊ साठे नगर पुतळ्या जवळ अर्धवट जळालेला जखमी अनओळखी व्यक्ती मुत्यू झाला माळीवाडा येथील आण्णा भाऊ साठे नगर पुतळ्या जवळ दि 08 बुधवारी रात्री साडेअकरा वाजता एक व्यक्ती रात्री अगावर रग घेऊन पडलेला आढळून आला होता त्याला स्थानिक रहिवाशांनी बघितले असता त्याचे तोंड व छाती जळली होती याची माहिती माळीवाडा येथील पोलीस पाटील प्रमोद साठे यांना ग्रामस्थांनी दिली पोलीस पाटील यांनी लगेच ही माहिती ११२ क्रमांक वर संपर्क करून पोलीस स्टेशनला याची माहिती दिली पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक संदीप वाघ व कर्मचारी घटना स्थळी दाखल झाले त्या जळालेल्या व्यक्तीला १०८ ॲम्बुलन्स ने घाटी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केलेउपचार सुरू असताना मध्य रात्री त्याची प्राणज्योत मालवळी सदर व्यक्ती हा पनास ते पंचावन्न वर्षाचा असून त्याच्या तोंड व छाती जळलेली आहे त्याचा अंगावर डिझेल चे वास येत होतेही आत्महत्या की घातपात याचा उलगडा पोलीस तपासत सिद्ध होईल त्याचे कडे जवळ एक आधार कार्ड सापडले आहे त्या आधार कार्ड बाबत पोलिसांनी आधार कार्ड बाबत माहिती घेतली असता त्या नावाचा व्यक्ती हा जिवंत असल्याचे पोलिसांना माहिती मिळाली जळलेला व्यक्ती हा अनोळखी असल्याचे पोलिसांनी माहिती दिली आहे.

या प्रकरणी दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस करत आहे (26 मार्च रोजी दौलताबाद पोलीस स्टेशन हद्दीत आसेगाव माळीवाडा रस्त्यावर एक अज्ञात महिलेचा खून झाला होता त्या महिलेची अद्याप पर्यंत ओळख पटलेली नाही तोच हा जळलेला अनोळखी व्यक्ती ची ओळख पटवण्यासाठी पोलिसांना कसरत करावी लागणार आहे)

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com


छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १० एप्रिल २०२६


## चारठाणा येथे अप्पर तहसील कार्यालयाला मंजुरी द्या : नागरिकांची मागणी तीव्र



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** तालुक्यातील चारठाणा हे मोठ्या लोकसंख्येचे गाव असून, येथे अप्पर तहसील कार्यालय स्थापन करण्याचा राज्य शासनाचा पूर्वीचा निर्णय अचानक रद्द करण्यात आल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या निर्णयामुळे चारठाणावासीयांवर अन्याय झाला असल्याची भावना व्यक्त होत असून, संबंधित निर्णय पुन्हा मंजूर करावा, अशी मागणी जोर धरत आहे.यासंदर्भात नानासाहेब राऊत यांनी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली आहे. तसेच, चारठाणा येथे अप्पर तहसील कार्यालयास मंजुरी देण्यासाठी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्याकडे लवकरच लेखी निवेदन सादर करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.चारठाणा येथे अप्पर तहसील कार्यालय सुरू झाल्यास परिसरातील हजारो नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. सध्या महसूल विभागाशी संबंधित कामांसाठी नागरिकांना जिंतूर येथे जावे लागते. मात्र, स्थानिक पातळीवरच उत्पन्न प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, रहिवासी दाखले, जमीन नोंदी, फेरफार आदी सेवा उपलब्ध झाल्यास नागरिकांचा वेळ आणि खर्च दोन्ही वाचणार आहेत.राज्य शासनाने यापूर्वी काढलेल्या परिपत्रकात चारठाणा व बोरी येथे अप्पर तहसील कार्यालय सुरू करण्याचे निर्देश दिले होते. मात्र, अचानक चारठाणा गावाचे नाव वगळून बोरी येथेच कार्यालयास मंजुरी देण्यात आल्याने चारठाणा व परिसरातील शेतकरी, व्यापारी आणि नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे.या पार्श्वभूमीवर काही शेतकरी व नागरिकांनी नानासाहेब राऊत यांची भेट घेऊन आंदोलनाबाबत चर्चा केली आहे. प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

## पुस्तकावर बोलू काही उपक्रमाचे आयोजन...




**छत्रपती संभाजीनगर :** येथे भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषदेच्या जिल्हा शाखेच्या वतीने पुस्तकावर बोलू काही या नविन उपक्रमाचे आयोजन (ता. 10 ) महात्मा गांधी स्मारक निधी भवन शासकीय ग्रंथालया जवळ येथे सायंकाळी 5.30 वा. करण्यात आले आहे. नवोदित लेखक - कवी यांच्या पुस्तकावर वाङ्मयीन चर्चा व्हावी, वाचकांशी संवाद साधता यावा, वाचन संस्कृती वाढावी, दखलपात्र साहित्याची व साहित्यिकांची दखल घेवून त्यांच्या लेखनाची चर्चा व्हावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. त्याचा प्रारंभ कवी अशोक गायकवाड यांच्या जीव रानात गहाण या पुस्तकापासून होणार आहे. कवी अशोक गायकवाड हे वैजापूर तालुक्यातील व मराठवाड्यातील नव्या पिढीचे महत्वाचे ग्रामीण कवी आहेत. शेती, माती, बदलते ग्रामजीवन आणि वर्तमान दाहक वास्तव विविध प्रश्नासह त्यांच्या कवितेतून अभिव्यक्त होतात. शेतीमाती, जीव रानात गहाण हे त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी भाषा परिषदेचे जिल्हा सचिव डॉ. नवनाथ गोरे असून डॉ. प्रकाश चोरघडे हे भाष्य करणार आहेत. यावेळी मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष तथा मराठी भाषा परिषदेचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव जिगे, संशोधन परिषदेच्या केंद्रिय कार्यकारिणीचे कार्याध्यक्ष डॉ. शिवाजी हुसे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमास रसिक, वाचक आणि साहित्यप्रेमिंनी हजर राहावे असे आवाहन भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषदेच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा शाखेच्या वतीने करण्यात आले आहे.

## सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांच्या हस्ते 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' विभागीय कार्यशाळेचे उद्घाटन



**बीड : (भगवंत पाळवदे)** जिल्हा व गाव पातळीवर विकास कामांबरोबरच नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. त्यासाठी राज्यातील प्रत्येक गाव आरोग्यसंपन्न करण्यासाठी “माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव” अभियान राबविण्यात येत आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी सर्व यंत्रणांनी पूर्ण क्षमतेने झोकूण देऊन काम करावे, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबीटकर यांनी केले. मंथन सभागृह, एमआयटी कॉलेज येथे विभागातील, 13जिल्ह्यातील जिल्हा स्तरावरील,पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकरिता आयोजित 'माझं गाव,आरोग्य संपन्न गाव' विभागीय कार्यशाळाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी पालकमंत्री तथा सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट होते. तसेच अकोलेचे आमदार डॉ.किरण लहामटे, वैजापूरचे आमदार रमेश बोरनारे, धाराशिव जिल्हा परिषद अध्यक्ष अर्चना पाटील, छत्रपती संभाजी महानगरपालिकेचे उपमहापौर राजेंद्र जंजाळ, सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, सार्वजनिक आरोग्य विभागाचे आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, सार्वजनिक आरोग्य विभागाचे आयुक्त (शहरी आरोग्य) डॉ. सुनील भोकरे, छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मीन्नू पी.एम,आरोग्य सेवा संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, तसेच आरोग्य सेवा संचालक (प्राथमिक)डॉ. विजय कंदेवाड व्यासपिठावर उपस्थित होते.श्री. आबीटकर म्हणाले, आरोग्य विभागामार्फत गाव,आरोग्य संपन्न गाव' अभियान राबविण्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्रिमंडळ यांनो स्वागत करीत बैठकीत अभियानाला मंजूरी दिली. प्रत्येक लोकप्रतिनिधींनीही आपल्या मतदार संघात विकास कामांबरोबर जबाबदारीने मतदार संघाच्या आरोग्याची काळजी घ्यावी. जिल्हा पातळीवर सर्वांना विश्वासात घेऊन 'माझं गाव,आरोग्य संपन्न गाव' अभियानात पुढे जावे. जिल्हा , तालुका,तसेच गाव पातळीवरील सर्व समित्यांची स्थापना करून त्यासंबंधीतांना प्रशिक्षित करावे. आजाराच्या सुरवातीच्या टप्यात निदान करण्याची यंत्रणा आपल्याकडे आहे. कॅन्सर, बीपी, शुगर आणि इतर आजारांची वेळीच तपासणीसाठी आशा सेविका, आरोग्य अधिकारी या यंत्रणांनी घरोघरी पोहचणे आवश्यक आहे.कोणीही आजारीच पडूच नये यासाठीचे उपाय संत तुकडोजी महाराजांनी आधीच लिहून ठेवलेले आहे त्याचा अवलंब आपल्या जीवनात करायचा आहे, असे श्री.आबिटकर यावेळी म्हणाले.हे अभियान शासकीय न राहता यामध्ये ज्यांना जी जबाबदारी दिली आहे त्यासाठी त्यांनी जबाबदारीने काम करायचे आहे. आपण समाजाचे देणे लागतो या भावनेने काम करायचे आहे. प्रत्येक नागरिकांने शासकीय रूग्णालयात उपचार घेतले पाहिजे यासाठी सगळ्या सेवा चांगल्या पध्दतीने लोकांपर्यत पोहचल्या पाहिजे. कोरोना काळामध्ये सरकारी दवाखा सर्वांसाठी आधार होता त्यापेक्षा अधिक उत्कृष्ट काम या अभियानात सर्वांनी लोकसहभागाच्या माध्यमातून करायचे आहे, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबीटकर यांनी केले. लोकप्रतिनिधींनी केलेल्या सुचनांनुसार लवकरच आरोग्य विभागात पदभर्ती करण्यात येणार आहे तसेच रूग्णालय सुरू करण्यासाठी आवश्य निधी उपलब्ध करून देणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.यावेळी पालकमंत्री श्री. शिरसाट यांनी मराठवाड्यातील मोठ्या प्रमाणातील रूग्ण छत्रपती संभाजीनगर येथे उपचारासाठी येतात. त्याप्रमाणात मोठ्या रूगणालयांचे विशेषत: महिला व शिशू रुग्णालयाची इमारती उभ्या राहिल्या परंतू काही कारणास्तव रूग्णालये अजून सुरू झाले नसल्याने रूग्णालये लवकरात लवकर सुरू करण्याची सूचना केली.आमदार डॉ. लहामटे 'माझं गाव,आरोग्य संपन्न गाव' अभियान राबवित असल्याबाबत शासनाचे आभार मानले. प्रत्येक नागरिकांनी आरोग्य संपन्न होण्यासाठी स्वत:च्या आरोग्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे, आपले गाव आरोग्य संपन्न होण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन कार्य करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.आमदार श्री.बोरनारे यांनी ग्रामीण भागात कॅन्सर रूग्णांच्या वाढत्या प्रमाणावर चिंता व्यक्त त्यावर उपाय योजना करण्याच्या सुचना केली. त्याच बरोबर शासकीय रूग्णालयात चांगले उपचार केले जातात त्यामुळे सर्व स्तरातील नागरिकांनी शासकीय रूग्णालयात उपचार घ्यावे, असेही ते यावेळी म्हणाले. जिल्हा परिषद अध्यक्ष अर्चना पाटील यांनी ग्रामीण भागातील आरोग्य विषयक विविधबाबीची माहिती देत आरोग्य विभागात आवश्यक बाबीची उपलब्धता करून देण्याबाबत विविध सुचना केल्या.अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. भंडारी म्हणाले, चांगल्या आरोग्याची सुरवात शुध्द पाण्यापासून सुरू होते. त्यामुळे गावांतील स्वच्छ पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, स्वच्छता यांचे नियोजन करणे आवश्यक आहे. त्यासाठी 'माझं गाव,आरोग्य संपन्न गाव' अभियान यशस्वी करण्यासाठी सर्व यंत्राणांचे सहयोग आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. विनायक निपुण यांनी 'माझं गाव,आरोग्य संपन्न गाव' अभियानाविषयी माहिती देत म्हणाले की, आरोग्य ही केवळ वैयक्तिक बाब नव्हे तर सार्वजनिक बाब आहे, त्यामुळे लोकसभागातून गाव आरोग्य संपन्न बनवायचे आहे. या अभियानाच्या माध्यमातून माता-बाल स्वाथ्य सुधारणे, साथ रोगाला टाळणे ते रोखण्यासाठी योग्य व्यवस्थापन करणे आणि बीपी, शुगर व इतर आजाराचे वाढणारे प्रमाण वेळीच रोखण्यासाठी उपाय योजना करणे हे मुख्य ध्येय आहे. त्यासाठी सर्वांनी समन्वयाने घरोघरी जाऊन तपासणी करून आपले गाव आरोग्य संपन्न गाव करायचे आहे. त्यासोबतच येत्या काळात हे अभियान शहरी भागात राबविण्यात येईल, असेही डॉ. विनायक म्हणाले. या कार्यशाळेला छत्रपती संभाजीनगर, लातूर, नाशिक परिमंडळातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, लातूर, धाराशिव, नांदेड, हिंगोली, नाशिक, अहिल्यानगर, धुळे, जळगाव व नंदुरबार या १३ जिल्ह्यातील उपसंचालक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी ,जिल्हा आरोग्य शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामीण आरोग्य व्यवस्थेतील सुधारणा, प्रतिबंधात्मक आरोग्य उपाययोजना, जनजागृती कार्यक्रम तसेच विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी याबाबत या कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करण्यात आले. तसेच “माझं गांव, आरोग्य संपन्न गाव” ही संकल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी आवश्यक असलेल्या कृती आराखड्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १० एप्रिल २०२६


## परीक्षा संपली

परीक्षा संपली
लागली आता सुट्टी
पुस्तक दूर ठेवूनी
करुया खेळाशी गट्टी

परीक्षा संपली
मामाच्या गावी जाऊया
झुक झुक गाडीतून
हिरवी झाडी पाहूया

परीक्षा संपली
मनसोक्त नदीत पोहूया
रानावनात जावूनी
रानमेवा खाऊया

परीक्षा संपली
मैदानी जमला मेळा
ना अभ्यासाची चिंता
खुशाल आता खेळा

परीक्षा संपली
मित्रमंडळी जमली सारी
करूया गमती जमती
खाऊनी भेळपुरी




- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


## आरोग्यम् धनसंपदा!

गड्या सकाळी सकाळी,
दररोज लवकर उठावे.
प्रातर्विधी करूनच,
सदा योगासनास बसावे. १

नियमित योगासन करता
होणार नाहीत तुला रोग.
कसरत नाही केल्यास,
शरीर होई वेदनेचा भोग. २

वेळातला वेळ काढून,
व्यायाम करावे तू नित्य.
ऋषीमुनींनी सांगितले,
जीवनातले कटू सत्य. ३

आरोग्यम् धनसंपदा,
म्हणणे ठरते की खरे.
नित्य व्यायाम केल्याने.
आरोग्य राहणार बरे. ४

म्हणून म्हणतो माणसा,
दररोज व्यायाम करावे.
निरोगी आयुष्य जगून,
जीवनात सप्तरंग भरावे. ५




नागेश बोंतेवाड,
छत्रपती संभाजीनगर


# एका शिक्षकाला तहसील सोडेना, दुसऱ्याचे झाले समायोजन




**कन्नड (अरुण थोरात) :** अतीदुर्गम, आदिवासी भागात वसलेल्या कळंकी ता.कन्नड येथील जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापक पद रिक्त आहे, दुसरा एक शिक्षक कित्येक वर्षांपासून प्रतिनियुक्तीवर तहसील कार्यालयात ठाण मांडून बसला असतांनाच, विद्यार्थ्यांच्या आधारकार्ड अभावी तिसऱ्या एका शिक्षकाचे शिक्षण विभागाने समायोजन केल्याने भीतीने पालकांत चिंतेचे वातावरण निर्माण होउन विद्यार्थी वर्ग गटशिक्षणाधिकारी कार्यालयात भरविण्याचा ईशार ग्रामस्थांनी दिला आहे. एकी कडे दुर्गम आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी च्या योजनांचा गाजावाजा करीत आहे. तर दुसरीकडे शिक्षण विभागाच्या दुर्लक्षामुळे शिक्षकां अभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. असाच काहीसा प्रकार कळंकी जि.प. शाळेत घडत आहे.याबाबत दि. ०८ एप्रिल रोजी ग्रामस्थांनी गटशिक्षणाधिकारी कन्नड यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कळंकी जि.प. शाळेत इयत्ता पहिली ते पाचवी वर्गाची पट संख्या १३५ असून त्यापैकी ११२ विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढलेले आहेत. उर्वरित २३ विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढण्या बाबत पालकांना वेळोवेळी सुचना देउन ही आधारकार्ड काढले नाहीत. तसेच गटशिक्षण विभागातून ही आधारकार्ड कँप आयोजित करण्याबाबत कार्यवाही झाली नाही. त्यामुळे सदरील विद्यार्थी आधारकार्ड पासून वंचित आहेत. या कारणा वरुन शाळेतील एक शिक्षक समायोजनात पाठविला आहे. आधारकार्ड नसलेल्या या २३ विद्यार्थ्यांना शाळेत बसू द्यायचे की नाही. याबाबत चा खुलासा शिक्षण विभागाने करावा. अन्यथा सर्व विद्यार्थी गटशिक्षणाधिकारी कार्यालयात आणून बसवू, याची नोंद घ्यावी, तसेच शाळेतील दुसरा एक शिक्षक प्रतिनियुक्तीवर तहसील कार्यालयात अनेक दिवसापासून गेला असल्याने त्यांना पर्यत शाळेवर पाठविण्यात यावे अशी मागणी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष रमेश थोरात, सोमनाथ आगळे, गुलाब कदम, प्रमोद थोरात, समाधान थोरात, मच्छिंद्र वाकळे, रतन मधे, गोपीनाथ आगीवले, दिगंबर वाणी आदींनी निवेदनात केली आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय यांच्या वतीने अभिनव 14 तास सलग वाचन उपक्रम

**कन्नड :** महापुरुषांच्या विचारांची प्रेरणा समाजात रुजविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय, बाळासाहेब पवार फाउंडेशन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने "१४ तास सलग वाचन" हा उपक्रम दि. १२ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे.सदर उपक्रम सकाळी ७.०० ते रात्री ९.०० या वेळेत वाचनालयाच्या सभागृहात पार पडणार असून, यामध्ये शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. वाचनाची सवय वाढावी आणि विद्यार्थ्यांमध्ये बौद्धिक विकास घडावा हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.हा उपक्रम सलग चौथ्या वर्षी आयोजित करण्यात येत असून, दरवर्षी विद्यार्थ्यांचा सहभाग लक्षणीयरीत्या वाढत आहे. त्यामुळे या उपक्रमाला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येते.१४ तास सलग वाचन पूर्ण करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार असून, निवडक विद्यार्थ्यांना विशेष बक्षिसे देखील प्रदान करण्यात येणार आहेत. या उपक्रमासाठी नोंदणी करणे आवश्यक असून, प्रथम येणाऱ्यास प्राधान्य दिले जाणार आहे.या उपक्रमा अंतर्गत दि. १३ एप्रिल २०२६ रोजी बक्षीस वितरण सोहळा आयोजित करण्यात आला असून, सहभागी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

इच्छुक विद्यार्थ्यांनी 8888805439 यात्रमांकावर वेळेत नोंदणी करून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती आणि सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय यांच्या वतीने वतीने करण्यात आले आहे.

## सैय्यद लायकोद्दीन यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी निवड



**दौलताबाद (जावेद अहमद) :** येथील सैय्यद लायकोद्दीन यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष च्या अल्पसंख्यक विभाग छत्रपती संभाजीनगर जिल्हा कार्याध्यक्ष पदी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अल्पसंख्यांक विभाग अफजल फारुकी यांनी नियुक्ती केली यावेळी मान्यवरांनी सैय्यद लायकोद्दीन यांना शुभेच्छा देत त्यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती संभाजीनगर जिल्हा अल्पसंख्यक विभाग अधिक मजबूत होईल,असा विश्वास व्यक्त केला. नियुक्ती पत्र देते वेळेस खासदार सुप्रिया सुळे,महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे, युवक अल्पसंख्यक विभाग चे महेबुब शेख, अल्पसंख्याक विभागाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अफजल फारुख, अल्पसंख्याक विभागाचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष डॉ. मुझहेद, वारीस खान, प्रदेश महासचिव सलीम पटेल वाहेगावकर, जिल्हा अध्यक्ष रज्जाक पठाण महाराष्ट भरातील जिल्हाध्यक्ष उपस्थित होते.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १० एप्रिल २०२६

# महात्मा फुले यांच्या कृषी विषयक विचारांची आजची प्रासंगिकता

भारतीय समाजपरिवर्तनाच्या इतिहासात अमिट ठसा उमटवणारे महात्मा जोतिराव फुले यांचे जन्म द्विशताब्दी वर्ष साजरे करत असताना त्यांच्या बहुआयामी कार्याचा नव्याने आढावा घेण्याची संधी आपल्या समोर उभी आहे. समाजसुधारक, समतावादी आणि मानवतावादी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या फुले यांनी शेतकरी आणि कृषी व्यवस्थेच्या प्रश्नांवरही अत्यंत सखोल आणि दूरदर्शी विचार मांडले आहेत. ते फक्त विचार मांडून थांबले नाहीत तर शेतकऱ्यांच्या तत्कालीन समस्येवर त्यांनी उपाययोजना ही सुचवल्या आहेत. शिवाय शेतकरी हितांच्या प्रश्नांवर ते प्रसंगी सरकार दरबारी भांडले ही आहेत. त्यांनी सांगितलेले विचार आज एकविसाव्या शतकामध्ये ही शेतकऱ्यांच्या जीवनमानामध्ये अमुलाग्र परिवर्तन घडविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरतात. आजच्या बदलत्या सामाजिक-आर्थिक आणि पर्यावरणीय परिस्थितीत त्यांच्या कृषी विषयक विचारांची प्रासंगिकता अधिक ठळकपणे जाणवते.

महात्मा फुले यांनी १८ जुलै १८८३ रोजी 'शेतकऱ्यांचा असूड' हा ग्रंथ लिहून पूर्ण केला. या ग्रंथातून शेतकऱ्यांच्या जीवनातील दारिद्र्य, शोषण आणि अन्याय यांचे प्रभावी चित्रण त्यांनी केले. त्यांच्या मते शेतकऱ्याच्या अज्ञानाचा फायदा समाजातील इतर वर्ग घेत असतात. आणि त्याच्या पुढच्या पिढ्या ही शिकू नयेत याचीच सोय ते करत असतात. या ग्रंथातून ते भटब्राम्हण आपल्या स्वार्थाच्या पोटी गरीब, अडाणी आणि अज्ञानी शेतकऱ्यांची कशी फसवणूक करतात याविषयी सखोल भाष्य करताना दिसतात. त्याचबरोबर इंग्रज सरकारातील गोरे अधिकारी कसे एशोआरामात गुंतले आहेत आणि त्यामुळे त्यांचे शेतकऱ्यांच्या वस्तुस्थितीकडे कसे दुर्लक्ष होत आहे याच्यावरही त्यांनी प्रकाश टाकला आहे. त्यांनी दाखवून दिले की शेतकरी हा समाजाचा कणा असूनही तोच सर्वाधिक उपेक्षित राहतो. सावकार, जमीनदार आणि सत्ताधारी घटकांच्या प्रभावामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या गुलाम बनतो, त्याचबरोबर ते सांगतात की तुमच्या गुलामगिरीला ज्याप्रमाणे इतर घटक जबाबदार आहेत तसेच त्याला तुम्ही स्वतःही जबाबदार आहात. तुम्ही शिक्षण घेतले पाहिजे आणि समाजात घडणाऱ्या प्रत्येक घटनेकडे उघड्या डोळ्याने पहावयास शिकले पाहिजे. ही वस्तुस्थिती त्यांनी आपल्या लेखनातून निर्भीडपणे मांडली.

ते आपल्या पुस्तकातून शेतकऱ्यांनी आपल्या शेतीमध्ये कोणत्या सुधारणा करावयात आणि त्यासाठी काय-काय करता येईल याविषयी सखोल भाष्य करतात. महात्मा फुले स्वतः शेतकरी होते. ते शेतात राबत असल्याने त्यांना शेती विषयक समस्यांची जाण होती. त्यांना माहीत होते की शेतीत शेतकरी जे कष्ट करतो त्याच्या तुलनेत त्यांना मोबदला अत्यंत नगण्य भेटतो. म्हणून ते शेतकऱ्यांना सरकारने योग्य भाव देऊन पिकांना संरक्षण देण्याविषयी लिहितात. त्याचबरोबर, शेतकऱ्यांनी विविध संकरित बियाणांचा उपयोग करून आपले उत्पन्न वाढवण्यावर जोर द्यावा असेही ते शेतकऱ्यांना सुचवतात. आजही आपण पाहतो की काळ जरी बदलला असला तरी शेतकऱ्यांच्या समस्या त्याच आहेत आजही शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित हमीभावासाठी झगडावे लागत आहे. पुढे महात्मा फुले आपल्या शेतकऱ्यांचा आसूड या पुस्तकामध्ये तत्कालीन ब्रिटिश सरकारला सुचवतात की, जलसंवर्धन करण्याच्या हेतूने नदी आणि छोट्या ओढ्यांवर बंधारे बांधून पाणी अडवण्यासाठी सरकारने त्यांच्याकडे असलेल्या कामगारांकरवी हे कामे करावेत. त्याचबरोबर ते पुढे म्हणतात की शेतकरी मोठ्या कष्टाने आपली शेती पिकवीत असतो परंतु त्याच्या हाता-तोंडाशी आलेला घास जंगली रानडुकरे वगैरे तत्सम प्राणी पिकांची नुकसान करून त्याच्या तोंडातून काढून घेतात. यासाठी सरकारने शेतकऱ्यांना गावठी तोड्याच्या बंदुका वापरण्याची परवानगी द्यावी आणि असे करण्याची सरकारची छाती होत नसेल तर, सरकारने पोलीस आणि वनखात्याकडे हे काम सोपवून तसा कायदा करावा. यापुढे जाऊन ते सांगतात की शेतकऱ्यांच्या शेतांचे रानडुकरे वगैरे जनावरांनी खाऊन नुकसान केल्यास ते सर्व नुकसान संबंधित अधिकारी अमलदारांच्या पगारातून कापून अथवा सरकारी खजिन्यातून शेतकऱ्यास भरून द्यावे. शेतकरी दिवसभर शेतीत राबतो आणि रात्रभर त्याला पिकांची राखण करावी लागते यामुळे त्याचे हाल होत आहेत. शिवाय त्याचा विपरीत परिणाम त्याच्या उत्पादन शक्तीवर होत आहे असेही ते नमूद करतात. पुढे जाऊन ते म्हणतात की, शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी बैलांची आवश्यकता आहे त्यासाठी सरकारने या जनावरांना मारण्यास बंदी घालावी त्याऐवजी शेळ्या-बकऱ्या मारून खाण्याची मुभा द्यावी.

ज्योतिराव फुले फक्त सरकारला सूचना देत नाही तर शेतकऱ्यांनाही शिक्षित होण्यासंदर्भात सुचवतात. ते सांगतात की ज्या शेतकऱ्यांना शक्य असेल त्यांनी रात्र शाळेत जावे आणि आपल्या मुलांनाही शाळेत घालून त्यांचे योग्य प्रकारे संगोपन करावे. महात्मा फुलेंचा शेतीच्या शाश्वत विकासावर भर होता त्यामुळे ते शेतकऱ्यांना उद्देशून लिहितात की, शेतकऱ्यांनी आपल्या जमिनीची धूप होऊ नये म्हणून शेतीवर गरज असेल तेथे बांध घालून जमिनीची धूप थांबवावी. त्याचबरोबर आपल्या जमिनीमध्ये विहीर खोदणाऱ्या शेतकऱ्यांस सरकारने लहान मोठी बक्षिसे द्यावी. सर्व नदी नाले व तलावांतील साचलेला गाळ शेतकऱ्यास फुकट नेऊ द्यावा. सरकारने विविध देशातून वेगवेगळ्या जनावरांच्या आणि शेळ्या मेंढ्यांच्या विविध जाती खरेदी करून त्या आपल्या देशात आणून त्यापासून येथे उत्पन्न निर्मिती करावी आणि शेतकऱ्यांना त्या सवलतीच्या दरामध्ये कशा मिळतील याचा बंदोबस्त करावा. त्यांनी शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाला एक मोठी गंभीर समस्या मानले आहे त्यांनी कमी व्याजदराने कर्ज, शासकीय संरक्षण आणि आर्थिक मदतीवर भर दिला. आजही उत्पादन खर्चातील वाढ, त्या तुलनेत कमी नफा आणि अनिश्चित उत्पन्न यामुळे शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबला आहे. हीच परिस्थिती अनेक ठिकाणी शेतकरी आत्महत्यांसारख्या टोकाच्या घटनांमध्ये परावर्तित होत आहे.

महात्मा फुलेंनी त्याकाळी शेतीविषयक मांडलेले विचार आणि शेतकरी व सरकारला सुचवलेल्या सूचना आजही किती महत्त्वपूर्ण आहेत हे आपणास पटते. स्वातंत्र्यानंतर सरकारने यातील बहुतांश सूचना आपल्या धोरण प्रक्रियेमध्ये समाविष्ट केल्या आहेत परंतु अद्याप शेतकऱ्यांचे जीवनमान अपेक्षित रित्या उंचावले नाही. महात्मा फुलेंनी सुचवल्याप्रमाणे सरकार शेतकऱ्यांना विहिरीसाठी शासकीय मदत म्हणून अनुदान देते, शेळ्या मेंढ्या घेण्यासाठी शासकीय स्तरावरून अनुदान भेटते, शेतकऱ्यांना कमी व्याजदराने शेतीच्या मशागतीसाठी आणि विविध पिके घेण्यासाठी कृषी कर्जे सरकार देते. त्याचबरोबर जल संवर्धनासाठी साम्प्रत सरकारने वेगवेगळ्या योजना केल्याचेही आपणास दिसते. या सर्व गोष्टींचा विचार करता महात्मा फुलेंनी त्या काळामध्ये सांगितलेले विचार आजही शेती विकासासाठी मार्गदर्शक आणि प्रासंगिक असल्याचे आपण ठामपणे म्हणू शकतो. आणि याचमुळे या महामानवास आपण महात्मा असे म्हणतो. महात्मा तोच असतो जो काळाच्या पुढे जाऊन विचार करतो आणि त्याचे विचार सर्वमान्य असतात.

क्रांतीसुर्य महात्मा जोतिराव फुले यांनी शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी शिक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा स्वीकार आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले होते. आधुनिक शेती पद्धती, सुधारित बियाणे आणि माहितीचा योग्य वापर यामुळे उत्पादनक्षमता वाढवता येते, हा त्यांचा ठाम विश्वास होता. जोतिबांनी कार्ल मार्क्सच्या आधी शोषणाचे सत्य मांडले. धर्माच्या मागे अर्थकारण असते हे विचार त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या स्थितीसाठी त्यांनी त्यावेळी दिलेली कारणे आणि सुचविलेले उपाय आजही कालप्रभावी आहेत. आज भारतीय कृषी क्षेत्र अनेक समस्यांनी वेढलेले आहे. अनियमित मान्सून पर्जन्य, हवामान बदल, लहान जमीनधारणा, वाढता उत्पादन खर्च, आणि बाजारातील अनिश्चितता.

या सर्व समस्यांचा विचार करता जोतिराव फुले यांनी मांडलेले विचार आजही मार्गदर्शक दीपस्तंभ म्हणून महत्त्वाचे ठरतात. क्रांतीसुर्य महात्मा फुले यांचे कृषी विषयक विचार हे केवळ ऐतिहासिक वारसा नसून, आजच्या कृषी व्यवस्थेसाठी मार्गदर्शक तत्त्वे आहेत. त्यांच्या जन्म द्विशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या कृषी विषयक विचारांचे पुनर्मूल्यांकन करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे ही काळाची गरज आहे आणि हेच शेतकऱ्यांच्या सर्वार्थाने हिताचे आहे.

क्रांतीबा ज्योतिराव फुले यांच्या जन्म द्विशताब्दी वर्षानिमित्त सर्वांना शुभेच्छा !

**अशोक दिलीप जायभाये.**
लेखक डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये पीएचडी करत आहेत.
Ph.D. Senior Research fellow
(Dr.BAMU)
मो. 9767068051
ईमेल – ashokdj141194@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १० एप्रिल २०२६



## तिफण वाचक चळवळ राज्य कार्याध्यक्षपदी डॉ. रामचंद्र झाडे



**कन्नड (प्रतिनिधी) :** वाचन संस्कृतीचे जतन व संवर्धन व्हावे. ग्रामीण भागात वाचन चळवळ वृद्धिंगत व्हावी, उत्तमोत्तम वाचक तयार व्हावेत या महत्वपूर्ण उद्देशाने त्रैमासिक तिफण पुरस्कृत तिफण वाचक चळवळ कार्यरत आहे. या वाचक चळवळीच्या वतीने सातत्याने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. तिफण वाचक चळवळच्या राज्य कार्याध्यक्षपदी प्रा.डॉ. रामचंद्र झाडे यांची निवड करण्यात आली आहे.डॉ. रामचंद्र झाडे हे कन्नड येथील शिवाजी महाविद्यालयात मराठी विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. ते कवी, लेखक असून संत साहित्याचे अभ्यासक आहेत. त्यांची अनेक पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. तिफण त्रैमासिकाचे ते स्थापनेपासून संपादक मंडळ सदस्य असून वाङ्मयीन चळवळीतील सक्रिय कार्यकर्ते आहेत. त्यांच्या एकूणच वाङ्मयीन कार्याची दखल घेऊन त्यांची ही निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीबद्दल श्री छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मानसिंह पवार, साहेब तिफण सल्लागार समिती चे प्राचार्य डॉ. विजय भोसले, अँड. कृष्णा जाधव , डॉ. अंबादास सगट,डॉ. रमेश सूर्यवंशी,डॉ. प्रतिभा अहिरे, मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष तथा मराठी भाषा परिषदेचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव जिगे, तिफण वाचक चळवळ चे संस्थापक अध्यक्ष डॉ. शिवाजी हुसे, अध्यक्ष डॉ. दिलीप बिरुटे, उपाध्यक्ष डॉ. सुवर्णा गुंड - चव्हाण , तिफण संपादक मंडळ सदस्य डॉ. नवनाथ गोरे, डॉ. राम गायकवाड, डॉ. उदय डोंगरे , डॉ. संतोष देशमुख, आदींनी अभिनंदन केले आहे.

## डॉ. अंबादास आरगडे यांना 'डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम नेशन स्टार अवॉर्ड'



**छत्रपती संभाजीनगर :** देवगिरी महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागात कार्यरत सहाय्यक प्राध्यापक डॉ. अंबादास आरगडे यांना एम सी ए आणि नीती आयोगद्वारा स्थापित 'वेलरड फाउंडेशन' पश्चिम बंगालचा 'डॉ.ए. पी. जे. अब्दुल कलाम नेशन स्टार अवॉर्ड' नुकताच प्राप्त झाला. डॉ.अंबादास रोहिदास आरगडे हे 2011 पासून देवगिरी महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य करत असून त्यांचे एकूण 15 ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत. याची दखल घेऊन त्यांना या पुरस्कारने सन्मानित केले आहे. याबरोबरच त्यांना या पूर्वी बाबू जगजीवन राम कला संस्कृती तथा साहित्य अकादमी नवी दिल्लीचा राजर्षी शाहू महाराज राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार, आणि महात्मा जोतिबा फुले आंतरराष्ट्रीय पुरस्कार तसेच अर्जुन चॅरिटेबल फाउंडेशन कोरेगावचा इंटरनॅशनल एजुकेशनल अवॉर्डने सन्मानित करण्यात आलेले आहे. त्यांनी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरावरील 118 चर्चासत्रे, परिषदा, एफ. डी. पी. आणि कार्यशाळात सक्रिय सहभाग घेतलेला आहे. त्यांचे जर्नलमध्ये 38, संपादित ग्रंथात 32,समरणिकेत 14 आणि वर्तमानपत्रात 1 असे एकूण 86 संशोधनलेख प्रकाशित झालेले आहेत. "मराठवाड्याच्या शैक्षणिक विकासात मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाची भूमिका" या विषयावर त्यांनी डॉ. प्रतिभा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच. डी. संशोधन कार्ये पूर्ण केलेले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची पीएच. डी. ही त्यांना प्रदान करण्यात आली आहे. या यशाबद्दल प्राचार्य डॉ. रवी पाटील, उपप्राचार्य डॉ गणेश मोहिते उपप्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर हिवरे, डॉ. राजेश लहाने, डॉ. ज्ञानेश्वर जिगे, डॉ. कैलास ठोंबरे,डॉ. अतुल पवार, डॉ. बाळासाहेब निर्मळ, डॉ. जिजा शिंदे, डॉ. भाऊसाहेब शिंदे, डॉ.नीरजकुमार बोरसे, डॉ. अविनाश धोतरे, डॉ. संदीप शिरसाट, डॉ. अंकुश मोताळे, प्रा. ओंकार जोगदंड यांनी अभिनंदन केले.

## डॉ. रा. श्री. मोरवंचीकर व डॉ. जयसिंगराव पवार यांनी महाराष्ट्रात इतिहास लेखनाची तात्विक बैठक निर्माण केली



**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्राने अनेक नामवंत इतिहासकार निर्माण केले आणि त्या इतिहासाला तात्विक चिंतन निर्माण करण्याचे काम केले. यामध्ये डॉ. रा.श्री मोरवंचीकर व डॉ. जयसिंगराव पवार यांचे कार्य मोठे आहे. असे प्रतिपादन या दोन महान इतिहासकारांच्या श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास व प्राचीन भारतीय संस्कृती विभागातर्फे डॉ. रा श्री मोरवंचीकर व डॉ. जयसिंगराव पवार यांच्या श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी मान्यवरांनी मते मांडली होती. डॉ. जयसिंगराव पवार यांच्या विषयी डॉ.वि. ल धारूरकर यांनी मांडणी केली.त्यांनी डॉ.जयसिंगराव पवार यांच्या इतिहासलेखनाचा आढावा घेऊन त्यांनी मराठ्यांच्या इतिहास लेखनात छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी यांच्या पुढे जाऊन छत्रपती राजाराम, राणी ताराराणी व राजषी शाहू महाराजांच्या विषयी जे महत्त्वपूर्ण लेखन केले आणि महाराष्ट्राला मराठ्यांचा इतिहासाची भाष्यकार म्हणून त्यांची ओळख निर्माण केली.आधुनिक राजे राजषी शाहू महाराजांचा इतिहास जगासमोर आणून त्यांनी इतिहास लेखनामध्ये एक आपली वेगळेपण दाखऊन दिले. डॉ रा.श्री मोरवंचीकर यांच्या इतिहास लेखनावर डॉ. दुलारी कुरेशी यांनी आपले मत मांडले डॉ. मोरवंचीकरांच्या कार्याचा उल्लेख करून त्यांनी पैठण, दौलताबाद उत्खननाच्या काही आठवणी सांगून त्यांनी जी शिकवण उत्खननामध्ये दिली त्याचा वापर केला.त्यांनी वेरूळ येथील महोत्सव औरंगाबाद येथे आणून औरंगाबाद वेरूळ महोत्सव असे नाव देऊन औरंगाबाद शहरवासीयांना औरंगाबादची नव्याने ओळख करून देण्याचे काम मोरवंचीकर सरांनी केले त्याचबरोबर त्यांनी जे इतिहास लेखनामध्ये वेगळेपण दिले त्याचा सविस्तर आढावा सुद्धा कुरेशी मॅडमनी घेतला. डॉ. श्रीनिवास सातभाई यांनी विद्यार्थी जीवनापासून ते त्यांच्या अंतिम क्षणापर्यंत त्यांचं जे नातं आहे त्याचा व त्यांच्या, इतिहास लेखनाचा समग्र आढावा घेऊन इतिहास लेखनामध्ये मोरवंचीकर सरांनी जे वेगळेपण दिले आहे त्याची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना करून दिली त्याचबरोबर त्यांनी इतिहास लेखनाला प्रोत्साहन देऊन अनेक विद्यार्थी घडवण्यामध्ये जे बहुमूल्य योगदान दिले आहे. एखादा इतिहास कसा लिहावा, कसा लिहू नये याचे परिपूर्ण ज्ञान हे मोरवंचीकर सातत्याने विद्यार्थ्यांना देत असतात वर्गात व वर्गाबाहेरच शिक्षण देण्याचं खरे काम जर कोणी केले असेल तर डॉ.मोरवांचीकर सरांनी केले असे प्रतिपादन यावेळी त्यांनी केले. डॉ. पुष्पा गायकवाड यांनी डॉ मोरवंचीकर यांनी इतिहास लेखनामध्ये जे नवीन बदल व त्याची मांडणी सर कसे पद्धतीशीर सांगायचे आणि त्यांच्या शिकवणीतूनच आज आम्ही घडलो असे प्रतिपादन यावेळी केले. त्याचबरोबर नव्या पिढीने त्यांच्या इतिहास लेखनातून प्रेरणा घेऊन इतिहास लेखनातील काही जे कच्चे दुवे राहिले आहेत त्यावर संशोधन करावे असे आवाहन केले. या श्रद्धांजली सभेचे आयोजन व त्याची भूमिका संयोजिका डॉ.बिना सेगार यांनी या दोन महान इतिहासकारांनी इतिहास लेखनामध्ये जे नाविन्य आणले आणि आपल्या कर्तृत्वाने इतिहासाला एक नवी दिशा देण्याचे काम केले आहे याचा सविस्तर आढावा घेतला व श्रद्धांजली सभेच्या आयोजनामागची भूमिका स्पष्ट केली.

या श्रद्धांजली सभेच्या कार्यक्रमासाठी शहरातील गणमान्य व संशोधक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ कामाजी डक यांनी केले तर, आभार प्रदर्शन डॉ. संजय पाईकराव यांनी केले.या श्रद्धांजली सभेच्या यशस्वितेसाठी डॉ. राहुल बचाटे, डॉ. सुवर्णमाला मस्के, डॉ. रवी गवांदे प्रियदर्शन हटकर,डॉ. अश्विन जोगदंड डॉ. कुमार भवर व मच्छिंद्र चौधरी यांनी परिश्रम घेतले.



## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |